# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १५.०१.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १४/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ११४ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५३,३००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. १४/०१/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ०८.०१ लिटर दारू असा एकुण ४,२६०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि. १४/०१/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली शहर व कुरूदा येथे प्रत्येकी ०१ असे एकुण ०२ गुन्हे कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा व कलम १३५ म.पो.का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल गुन्हे:—**

दि. १४/०१/२०२३ रोजी पोस्टे नर्सी नामदेव येथे कलम ३०४(अ),२७९,३३७ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील आरोपीने त्याचे ताब्यातील स्कुटी हि भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीस किरकोळ जख्मीकरून व स्वत:च्या मरणास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**अपघात दाखल गुन्हे:—**

दि.१४/०१/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली ग्रामीण येथे ०३ व पोस्टे कळमनुरी येथे ०१ अपघाताचे असे एकुण ०४ गुन्हे दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १४/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०४ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.